# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

---------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५ / फाल्गुन २१, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

-------------------------------------

**राज्यातील अवैध गर्भपात रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**(१) * ४७२८ श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात गर्भलिंग निदान, स्त्री-भ्रूण हत्या व अवैध गर्भपाताचे मोठे रॅकेट कार्यरत असून त्यात स्थानिक डॉक्टरांचा व गर्भपात सेंटरचा सहभाग असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रामुख्याने जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बुलढाणा जिल्ह्यात सदर रॅकेट कार्यरत असून यात २८ आरोपींवर गुन्हे दाखल करुन ३ डॉक्टरांना अटक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मोठया प्रमाणात अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात सेंटर कार्यरत असून यासाठी लागणाऱ्या गोळ्या व इंजेक्शन सहज उपलब्ध होत असून त्याची ऑनलाइन विक्री देखील होत असल्यामुळे या प्रकारांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकरणात महिला पुढे येऊन माहिती देत असून अशा महिलांचे मानधन वाढविण्याचा निर्णय शासनाने घेऊनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवैध गर्भपाताची अनेक प्रकरणे प्रलंबित असून ती तातडीने निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, या प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन यावर प्रतिबंध घालण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात काही प्रमाणात अवैध गर्भपाताच्या केसेस आढळून आल्या आहेत. मात्र यामध्ये जे सेंटर आढळून येत आहेत त्यांच्यावर संबंधित जिल्हा समुचित प्राधिकाऱ्यामार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

यामध्ये प्रामुख्याने जालना (३), छत्रपती संभाजी नगर (१८) आणि बुलढाणा (३) असे एकूण २४ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, यामध्ये ४ डॉक्टरांचा समावेश आहे व त्यांना अटक करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.

तथापि, दि. ०१.०४.२०२४ ते ३१.०१.२०२५ पर्यंत गर्भपात औषधांच्या गैरवापराबाबत राज्यात ०५ प्रकरणे आढळून आली आहेत व सदर प्रकरणात पोलिसांसमवेत कारवाई करण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.

दि.२० फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय झाला आहे. सदरच्या शासन निर्णयान्वये बनावट (डिकॉय) केसेस मधील महिलांना रु. १.०० लक्ष देण्याचा निर्णय झाला आहे व अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) अवैध गर्भपाताच्या ६६ केसेस न्याय प्रविष्ठ आहेत.

तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार निबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई व सर्व संबंधितांना पीसीपीएनडीटी अंतर्गत दाखल प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(६) दोषीवर समुचित प्राधिकाऱ्यामार्फत कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## वडखळ (जि.रायगड) येथील अंगणवाडी केंद्रात शालेय पोषण आहारात मृत उंदीर आढळून आल्याबाबत

**(२) * ३७५० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडखळ (जि.रायगड) ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी क्रमांक ३ मध्ये बालकांसाठी घरपोच वाटप करण्यात येणाऱ्या मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन या पोषण आहाराच्या पाकिटमध्ये मृत उंदीर आढळून आला असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन भविष्यात अशा घटनांना आळा घालणेसह यास जबाबदार पोषण आहार पुरवठा कंपनी विरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अंगणवाडी सेविका यांना घरपोच आहार वाटप करताना मल्टीमिक्स सिरीयल्स अँड प्रोटीनचे एक पाकीट कडक लागल्याने सदर पाकीट अंगणवाडी केंद्रामध्ये उघडण्यात आले. त्यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी तात्काळ तेथे भेट दिली. सदर पाकीट उघडून पाहिले असता त्यामध्ये मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष आढळून आले. त्यामुळे पुढील आहार वाटप तात्काळ थांबवण्यात आला.

तसेच, ज्या लाभार्थ्यांना आहार वाटप केला होता त्यांचा आहार अंगणवाडी सेविकेमार्फत अंगणवाडी केंद्रामध्ये जमा करुन घेण्यात आला. जमा करुन घेण्यात आलेल्या आहारापैकी आहाराचा नमुना सरपंच, सदस्य व ग्रामस्थांसमोर पंचनामा करुन हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीकरता पाठविण्यात आला होता. सदर अहवालानुसार घरपोच आहार खाण्यास योग्य आहे. तसेच संशयास्पद मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष असलेल्या आहाराचे पाकीट देखील तपासणीसाठी हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. परंतु, सदर प्रयोगशाळेने सदरचा नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही. त्यामुळे दिनांक २९/०१/२०२५ रोजी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई येथे सदर नमुना तपासणीकरता पाठविण्यात आला, परंतु त्या ठिकाणी देखील आहार नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही.

वडखळ ग्रामपंचायत अंतर्गत सर्व अंगणवाडी केंद्रातील वाटप झालेला घरपोच आहार ताब्यात घेवून पुन्हा नव्याने घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात आलेला आहे. संबंधित पुरवठाधारकास सदर पुरवठयाबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार संबंधित पुरवठाधारकाचा खुलासा प्राप्त झालेला आहे. सदर खुलाशानुसार घरपोच आहार हा मानवी हस्तक्षेप विरहीत (Fully Automatic) मशीनद्वारे तयार केला जातो. तसेच, सदर माल तयार झाल्यानंतर तो माल अंगणवाडीपर्यंत पोहचण्यासाठी १५ ते २० दिवसांचा कालावधी लागतो. सदर माल फॅक्टरीतून अंगणवाडी पर्यंत पोहचण्याच्या कालावधीवरून पाकीटामध्ये आढळून आलेला प्राणी सदृश अवशेष कोरडया स्वरूपात आढळून यायला पाहिजे होता. परंतू पाकीटामधील प्राण्याचे अवशेष ओल्या स्वरूपात असून तो एक ते दोन दिवसांपूर्वीच मृत झाला असावा असे वाटत आहे. तसेच फुल्ली ऑटोमॅटीक मशिनद्वारे घरपोच आहार तयार झाल्यामुळे पाकीटामध्ये उंदीर किंवा त्यासदृश दिसणाऱ्या वस्तूचे अस्तित्व राहणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३) * ५८५ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाकडून लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले ६२ कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे नादुरुस्त असून पूर्ण क्षमतेने कार्यरत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या बंधाऱ्यांपैकी १७ बंधारे निरुपयोगी ठरले असून त्यात पाणी साठवणूक होत नसून ४५ बंधाऱ्यांना गेटच बसविण्यात आलेले नसल्यामुळे या बंधाऱ्यांमधून अपेक्षित सिंचन होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे, बंधाऱ्यांना गेट बसविण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद लघुसिंचन विभागामार्फत ६२ कोल्हापुरी बंधारे बांधण्यात आले होते. त्यापैकी १७ बंधारे नादुरुस्त असून ४५ बंधाऱ्यांना गेट बसविण्यात आलेले आहे व त्याव्दारे अपेक्षित सिंचन होत आहे.

(३) जिल्हा परिषद लघुसिंचन विभागामार्फत ४५ कोल्हापुरी बंधाऱ्यांना गेट बसविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. उर्वरित १७ बंधारे नादुरुस्त असून नादुरुस्त बंधाऱ्यांमध्ये किरकोळ बाहयतीर बाजूने वाहून गेल्यामुळे व बंधा-याचे गेट गंजून निकामी झाल्यामुळे नादुरस्त आहेत. सदर बंधाऱ्याचे नवीन गेट खरेदी करुन बसवून अपेक्षित पाणी साठा निर्माण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथील माता आणि बाल रुग्णालयाच्या**
**इमारतीचे बांधकाम पूर्ण करणेबाबत**

**(४) * १९५० श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उप जिल्हा रुग्णालय भिवंडी (जि.ठाणे) येथील माता आणि बाल रुग्णालयाच्या विंग इमारतीचे नवीन बांधकाम धिम्यागतीने सुरु असून सदरहू बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे सप्टेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुपये ५८ कोटी इतक्या प्रकल्पास केवळ अधीक्षक अभियंता स्तरावरुन तांत्रिकदृष्टया मंजूरी व कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतीचे बांधकाम नवीनतम आय.आर.सी. मार्गदर्शक तत्त्वे,नॅशनल बिल्डिंग कोड व डीसीपीआरच्या नुसार होणे आवश्यक असताना कामांची तांत्रिक गुणवत्ता न राखता ही कामे करण्यात आली असून त्याकडे उप अभियंता यांनी दुर्लक्ष केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू बांधकामाकरीता वापरण्यात येणारे साहित्य न तपासणे, सदोष टेस्ट रिपोर्ट सादर करणे, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेकडे केलेले दुर्लक्ष इ.बाबींमध्ये संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचे आर्थिक संगनमत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजीवा त्यासुमारास पत्राद्वारे तत्कालिन मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करणेसह रुग्णालय इमारतीचे बांधकाम सत्वर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) काम प्रत्यक्षात सुरु झाल्यानंतर खोदाई करते वेळेस कठिण खडक लागल्याने तसेच आयजीएम हॉस्पीटल भिवंडी येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त असल्याने व पुढील काळात पावसाळा सुरु झाल्याने काम धिम्यागतीने सुरु होते ही बाब खरी आहे. सद्य:स्थितीत काम सुरळीत सुरु असून कामाचा दर्जा समाधानकारक आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी उपअभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, ठाणे यांचेकडून खुलासा मागविला होता. दिनांक ११/११/२०२४ रोजी उपभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, ठाणे यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी मान्य केलेला आहे. सदर काम जलद गतीने पूर्ण करणेबाबत सूचित केले आहे.

-----------------

**राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(५) * ५० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व),**

**श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेंतर्गत १८ ते ६५ वयोगटातील विहित अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या पात्र महिलांना दरमहा रु.१५०० इतके देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असतानाही त्यातील अनेक अपात्र महिलांना देखील या अनुदानाचे वाटप तसेच अनेक महिलांना अन्य योजनेंतर्गत दुबार वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या संकेतस्थळावर (Portal) नोंदणी करण्यास व माहिती भरण्यास अनेक अडचणी येत असून अनेक ठिकाणी ही नोंदणी प्रक्रिया स्थगित करण्यात आल्याने अनेक पात्र महिला या लाभापासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत दरमहा सुमारे ३६९० कोटी रुपयांचा खर्च होत असून या आर्थिक बोजामुळे अन्य योजनेंतर्गत प्राप्त होणारे अनुदान तसेच वेतन प्रलंबित असून या योजनेचे अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविकांना प्रति अर्ज रुपये ५० इतके प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेऊन अद्याप त्याचीही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जवळजवळ ५ ते ६ महिन्यांच्या अनुदानाचे वाटप केल्यानंतर आता या अर्जांची छाननी केली असता लाखो महिला यासाठी अपात्र ठरविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हे अनुदान थेट लाभ हस्तांतर (डीबीटी) द्वारे महिलांच्या खात्यात थेट जमा करणे आवश्यक असताना तसे न करता कोणतीही निविदा न काढता ही रक्कम आयसीआयसीआय बँकेत जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, रु.१५०० इतक्या अनुदानात वाढ करुन रुपये २१०० इतके करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी तसेच ६५ वर्षावरील महिलांना देखील या योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) सदर योजनेसाठी असलेल्या अटी व शर्तीची पूर्तता न करण्यात येणाऱ्या लाभार्थी महिलांना "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेतून वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही. हे खरे नाही. सदर योजनेंतर्गत नोंदणी करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात आलेला आहे.

(३) या योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका/अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्यासाठी रु.३१.३३ कोटी इतका निधी वितरीत करण्यांत आला आहे. त्याअनुषंगाने अंगणवाडी सेविका/अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन सुरु आहे.

(४) कोणत्याही योजनेत लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते. त्यानुसार या योजनेत देखील कार्यवाही सुरु आहे.

(५) थेट लाभ हस्तांतर (DBT) करण्याकरीता बँक खाते आवश्यक असते. वित्त विभाग, दि.२२.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयांच्या बँकिंग व्यवहारांसाठी निर्धारित करुन दिलेल्या बँकांपैकी एका बँकेत खाते उघडण्यास मुभा आहे. त्यानुसार या योजनेकरीता आयसीआयसीआय बँकेत खाते उघडून थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) पात्र लाभार्थी महिलांना आर्थिक लाभ अदा केलेला आहे.

(६) या योजनेच्या अटी व शर्तीनुसार सद्य:स्थितीत केवळ २१ ते ६५ या वयोगटातील पात्र लाभार्थी महिलांना दरमहा रु.१,५००/- इतका आर्थिक लाभ देण्यात येतो.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत

**(६) * १५२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कामकाज हे लोकाभिमुख, गतिशील व पारदर्शक होण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी पासून ई-ऑफीस प्रणालीव्दारे करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती ते ग्रामपंचायत कार्यालयातील जवळपास सर्वच विभाग हे डॅशबोर्डवर आले असतानाही तेथील कर्मचारी, विभाग प्रमुख ई-ऑफीसचा वापर करण्याचे टाळत असून अनेक ठिकाणी या पध्दतीचा वापर करण्याचे कोणतेही प्रशिक्षण नसल्यामुळे निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-ऑफीस निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक सुविधा, यंत्रणा, संगणक, इंटरनेट जोडणी, अखंडीत वीज पुरवठा, प्रशिक्षण इत्यादी सर्व सुविधा ग्रामस्तरापर्यंत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)असल्यास, या प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करणेसह यात टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

प्रशासकीय विभागांनी दि.१ जानेवारी,२०२५ पासून सर्व कामकाज ई-ऑफिस प्रणालीद्वारे करणे आवश्यक आहे

(२) व (३) हे खरे नाही.

शासन पत्र दि.३१ डिसेंबर, २०२४ अन्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना दि.१ जानेवारी, २०२५ पासून शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा वापर अनिवार्य करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाडा- बाळापूर (जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करणेसह येथे कुटुंब कल्याण योजनेंतर्गत शस्त्रक्रिया झालेल्या महिलांची गैरसोय झाल्याबाबत

**(७) * १४११ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा-बाळापूर (ता.कळमनूरी, जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयात कुटुंब कल्याण योजनेंतर्गत शस्त्रक्रिया झालेल्या ४३ महिलांना खाटा उपलब्ध नसल्यामुळे जमिनीवर झोपविण्यात आल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिलांवर शस्त्रक्रिया करण्याच्या दोन दिवस आधी अन्य महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली व त्यांना खाटा उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर उर्वरित महिलांना खाटा उपलब्ध नसल्याची माहिती असूनसुध्दा तातडीने इतक्या मोठया प्रमाणात पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, या ग्रामीण रुग्णालयात दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी वा त्या सुमारास विशेष बाब म्हणून ट्रॉमा केअर युनिटला मंजुरी देण्यात आली परंतु तेथे इमारत किंवा पदभरतीअभावी अद्यापही सदर युनिट कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परिसरातून मोठया प्रमाणात राष्ट्रीय व राज्य महामार्ग जात असून या महामार्गावरील अपघातातील गंभीर रुग्णांना उपचारासाठी नांदेडपर्यंत न्यावे लागत असून त्यात वेळ जात असल्याने अनेकांना जीवाला मुकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ट्रॉमा केअर युनिट सत्वर कार्यान्वित करणेबाबत तसेच यातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, सर्व रुग्णांसाठी Floor Bed (मॅट्रेस, बेडशिट, पिलो व ब्लॅंकेट इ.) ची व्यवस्था करण्यात आलेली होती.
(२) दिनांक १३.१२.२०२४ रोजी रुग्णांच्या नातेवाईकांच्या विनंतीवरुन व आग्रहास्तव शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथे शासन निर्णय, दिनांक ११.०३.२०२४ अन्वये ट्रॉमा केअर युनिटला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(४) अपघातग्रस्त रुग्णांना ग्रामीण रुग्णालय,आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथे उपचार केले जातात. आवश्यकतेनुसार गंभीर रुग्णांना जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे संदर्भित केले जाते.
(५) आखाडा बाळापूर (जि. हिंगोली) येथील ट्रॉमा केअर युनिटचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, आखाडा बाळापूर यांच्या स्तरावरुन कळविले आहे. अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त होताच या प्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी कार्यान्वित असलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

**(८) * ४७१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गर्भवती महिलांसाठी पंतप्रधान मातृवंदना योजना, अब्दुल कलाम अमृत आहार योजना, पोषण आहार योजना, जननी सुरक्षा योजना अशा विविध योजना आशा व अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून राबविल्या जात असतानाही राज्यात मोठया प्रमाणात गर्भवती महिला व बालकांचे मृत्यू होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांसाठी दरमहा मोठया प्रमाणात निधी व अनुदान खर्च करुनही बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यात शासनाला अपयश येत असून बऱ्याच ठिकाणी उपचारासाठी वेळेत रुग्णवाहिका न मिळणे, रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसणे, आशा व अंगणवाडी सेविकांचे दुर्लक्ष तसेच पोषण आहार व आरोग्य सेवांच्या अभावामुळे महिला व बालकांच्या मृत्यूंच्या घटनेत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन राज्यातील माता व बालमृत्यू रोखण्यासाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे राबविणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात गर्भवती महिला व बालकाकरिता जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना,मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृवंदना योजना इ. तसेच बाल आरोग्याकरिता विशेष नवजात शिशु काळजी कक्ष, नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष, कॉम्प्रिहेन्सिव्ह लॅक्टेशन मॅनेजमेंट सेंटर, पोषण पुनर्वसन केंद्र ॲनेमिया मुक्त भारत कार्यक्रम इ. आणि महिला व बाल विकास विभागामार्फत पुरक पोषण आहार, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, ग्राम बाल विकास केंद्र इत्यादी योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावीपणे अंमजबजावणी होत असल्याने गत तीन वर्षात माता व बालमृत्यूच्या प्रमाणात घट होत आहे.

माहे जानेवारी २०२५ मध्ये आपत्कालीन वैद्यकीय प्रकल्पाअतंर्गत ९३७ रुग्णवाहीकांमार्फत ८१४३ गरोदर मातांना सेवा देण्यात आली आहे. तर जेएसएसके रेफरल ट्रांसपोर्टच्या ३५९६ रुग्णवाहीकांमार्फत ३५७७१ गरोदर माता व नवजात बालकांना सेवा देण्यात आली आहे.

वैद्यकीय अधिकारी (S-२३) व वरीष्ठ पदे यांची एकूण १८०७ पदे मंजूर असून १०२७ इतकी पदे भरलेली असून ७८० पदे रिक्त आहेत, वैद्यकीय अधिकारी गट-अ (S-२०) यांची एकूण ८६१० पदे मंजूर असून, नियमित-६२१५, कंत्राटी-१२८२ व बंधपत्रित-३१३ अशी एकूण ७८१० इतकी पदे भरलेली असून ८०० पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-ब (S-१६) यांची एकूण १३१० पदे मंजूर असून ७३२ इतकी पदे भरलेली असून ५७८ पदे रिक्त आहेत, त्याचप्रमाणे आशा स्वयंसेवेकीची ८००८५ पदे मंजूर असून ७७०२२ इतकी पदे भरलेली असून ३०६३ इतकी पदे रिक्त आहेत. वरील सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत

**(९)** * **१३२४  श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या माध्यमातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण झालेल्या ५७ रस्त्यांच्या कामासंदर्भातील निविदेतील अटी व शर्तीमधील मुद्दा क्र.३२, १४, ४३, ४ यांसह मार्गदर्शक तत्वांमधील मुद्दा क्र.१२.२ ची पूर्तता करण्यात आली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे यांनी सदर रस्त्यांची गुणवत्ता निरीक्षक पाठवून तपासणी करण्याचे आदेश राज्य गुणवत्ता समन्वय, पुणे यांना दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रानुसार दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या कालावधीत कंत्राटदार कंपनीमार्फत DLP (Defect Lability Period) अंतर्गत देखभाल दुरुस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (प्रमंग्रासयो), पुणे यांच्यासह संबंधितांना दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या निवेदनानुसार करुनही अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर रस्त्यांची दुरुस्ती करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कारवाई  करणेबाबत कोणती  कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील ५७ कामांच्या दोष निवारण कालावधी तथा वृक्ष लागवडीबाबत विचारणा केली होती. त्यानुसार ५७ कामांपैकी २३ कामांच्या बाबतीत राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून तपासणी पूर्ण करण्यात आले आहेत. प्रस्तुत तपासणी पूर्ण झालेल्या २३ कामांच्या बाबतीत समाधानकारक शेरा असलेल्या कामांची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरीत ३४ कामांची तपासणी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) निविदा अट क्र.१२.२ अन्वये संबधित कंत्राटदारांना रस्त्याच्या दुर्तफा वृक्ष लागवड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार उक्त ५७ कामांपैकी १५ कामांमध्ये वृक्ष लागवड न केल्याने रू.१५.१९ लक्ष इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खासगी नर्सिंग होम्सच्या परवान्यांचे नुतनीकरण करणेबाबत

**(१०) * ४० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८९४७ खाजगी नर्सिंग होम्स पैकी ८८४ खाजगी नर्सिंग होम्सनी त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण अद्यापही केले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नर्सिंग होम्सच्या परवान्यांचे नूतनीकरण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात अशा नर्सिंग होममध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील खाजगी नर्सिंग होम्सच्या परवान्याचे नुतनीकरण जलदगतीने होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील खासगी नर्सिंग होम्सच्या परवान्याचे नुतणीकरण करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक/ जिल्हा आरोग्य अधिकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत करण्यात येते. दर तीन वर्षांनी खासगी नर्सिंग होम्सच्या परवान्याचे नुतणीकरण शेवटच्या वर्षातील दि. ३१ मार्च पूर्वी करणे अनिवार्य आहे.

(३) हे खरे नाही.

(४) त्यानुसार राज्यातील खासगी नर्सिंग होम्सच्या परवान्याची नोंदणी व नुतणीकरण जलदगतीने होण्याकरिता वेब आधारित ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, ती वापरकर्त्यांना https://maha-mnhregistration.co.in या ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्व जिल्हयांमध्ये “डे केअर केमो थेरपी सेंटर” सुरु करणेबाबत

**(११) * १४२२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम**

**(पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्करोगांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयात "डे केअर केमो थेरपी केंद्र" सुरु करण्याचा निर्णय माहे जून, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक जिल्ह्यात विशेषत: परभणी, हिंगोली व लातूर येथे अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे कर्करोग रुग्णांना मोठया अडचणींचा सामना करावा लागत असून आर्थिक भूर्दंड देखील सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये "डे केअर केमो थेरपी सेंटर" सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्यात डे केअर केमो थेरपी सेंटर हे टप्प्या टप्प्याने सुरु करण्यात येणार आहेत. यात पहिल्या टप्प्यात ९ जिल्हा रुग्णालयात (रत्नागिरी, सातारा, गडचिरोली, नाशिक, अमरावती, पुणे, धाराशिव, बीड, अकोला) सदर सेंटर्स सुरु करण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत लातूर येथे विवेकानंद कर्करोग रुग्णालयाच्या मार्फत केमो थेरपी आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. सदर रुग्णालय हे टर्शरी कॅन्सर केअर सेंटर योजनेअंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाशी संलग्न रुग्णालय आहे.

तसेच परभणी, हिंगोली या ठिकाणी "डे केअर केमो थेरपी सेंटर" कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे.

(३) सद्य:स्थितीत कर्करोग आरोग्य सेवा उपचाराकरिता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ९ जिल्हा रुग्णालय स्तरावर आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्यातील विविध शासकीय, ट्रस्ट आणि खाजगी रुग्णालयामार्फत आरोग्य सेवा दिल्या जात आहेत.

(४) परभणी, हिंगोली व लातूर जिल्हयात पुढील टप्प्यात "डे केअर केमो थेरपी सेंटर" सुरु करण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील कासेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करुन तेथे ट्रॉमा केअर सेंटर उभारणेसह मौजे. वशी येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत

**(१२) * १०५३ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासेगांव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मर्यादित आजारांवरच उपचार होत असून अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात अथवा लगतच्या जिल्ह्यामध्ये उपचारासाठी जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करुन त्याठिकाणी तज्ञ डॉक्टर, वाढीव खाटा, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे व कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कासेगाव हे पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग व पुसेसावळी- रत्नागिरीकडे जाणारा राज्यमार्ग या लगत असून सदरहू मार्गावर होणाऱ्या वाढत्या अपघातातील गंभीर रुग्णांवर तातडीचे उपचार होण्याकरीता सदरहू ठिकाणी अत्यावश्यक सोयी-सुविधायुक्त ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी देखील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मौजे वशी (ता.वाळवा, जि.सांगली) येथे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (PIP) (NRHM) योजनेंतर्गत नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबतचा प्राप्त प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी शासनाकडे पाठविला असून अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कासेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करणे, ट्रॉमा केअर सेंटरची निर्मिती करणे, वशी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक स्तरावरचे उपचार केले जातात. विशेष सेवांसाठी ग्रामीण वा उपजिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत केले जातात.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे. ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली यांच्याकडे करण्यात आली आहे.
(४) सदर प्रस्ताव निकषाप्रमाणे तपासून कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्राथमिक आरोग्य केंद्र, कासेगाव चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धनाच्या प्रस्तावाबाबत जिल्हा शल्य चिकित्सक स्तरावर तपासणी करुन प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. तसेच मौजे वशी, ता.वाळवा येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी अधिकचे शुल्क आकारले जात असल्याबाबत

**(१३) * ५२१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा काही खाजगी महाविद्यालये जास्त शुल्क आकारत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतच्या अनेक तक्रारी विद्यार्थी आणि पालकांकडून करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी आणि तपास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून त्या समितीचा अहवाल दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अहवालातील शिफारशी व त्याच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन अधिकचे शुल्क आकारणाऱ्या सर्व महाविद्यांलयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) राज्यातील विविध खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी नियोजित शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारले जात असल्याबाबतच्या तक्रारी प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे प्राप्त झाल्या होत्या.

(३) प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी आणि तपासणी करुन निर्णय घेण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्यामार्फत प्रत्येक महाविद्यालयाकरीता दोन ज्येष्ठ अध्यापकांच्या स्वतंत्र समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. सदर चौकशी समित्यांनी संचालनालयास सादर केलेला अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणास दिनांक २५/११/२०२४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे. सदर अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणाने पुढील कार्यवाहीकरीता दिनांक ०३/१२/२०२४ रोजी शुल्क नियामक प्राधिकरणास सादर केला आहे.

(४) व (५) समितीच्या अहवालातील शिफारशी तसेच अधिकचे शुल्क आकारणा-या महाविद्यालयांवर कारवाई बाबत शुल्क नियामक प्राधिकरणाकडून सदर प्रकरण Grievance Redressal Cell च्या बैठकीत निर्णयासाठी ठेवण्यात आले असून याबाबत "महाराष्ट्र खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५" कायद्यातील कलम-२० नुसार पुढील आवश्यक कार्यवाही शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य केंद्रात रुग्णवाहिकांची सेवा उपलब्ध करणेसह रुग्णवाहिका चालकांचे प्रलंबित वेतन अदा करणेबाबत

**(१४) * १५९ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच रुग्णालयांमध्ये रुग्णांची ने-आण करण्यासाठी रुग्णवाहिका पुरविण्यात येत असून अनेक ठिकाणी आरोग्य केंद्रांना अशा रुग्णवाहिका अद्यापही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील अनेक रुग्णवाहिका कालबाह्य झाल्या असून त्यांची दुरुस्ती वा नवीन रुग्णवाहिकांचे वाटप अद्यापही करण्यात आलेले नसल्यामुळे रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णवाहिकांवर चालक कंत्राटी पध्दतीने सेवा देत असून त्यांचे वेतन जवळजवळ वर्षभरापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, अनेक ठिकाणी विशेषत: अहिल्यानगर व चंद्रपूर येथे नव्याने रुग्णवाहिका देणे तसेच कालबाह्य रुग्णवाहिकांव्यतिरिक्त नवीन रुग्णवाहिकांचे वाटप तातडीने करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन आवश्यक त्या सर्व ठिकाणी रुग्णवाहिकांची सेवा उपलब्ध करुन देणे, कालबाह्य रुग्णवाहिकांऐवजी नवीन रुग्णवाहिकांचे तात्काळ वाटप करणे, कंत्राटी रुग्णवाहिका चालकांचे प्रलंबित वेतन अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सर्व आरोग्य संस्थांमध्ये कार्यरत जिल्हानिहाय एकूण ३३७७ रुग्णवाहिका कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

राज्यातील कालबाह्य (१५ वर्षे आर्युमान पूर्ण झालेल्या/निष्कासित) रुग्णवाहिकांच्या बदल्यात उपलब्ध अनुदान व प्रशासकीय मान्यतानुसार सन २०२४-२५ मध्ये ३८४ नवीन रुग्णवाहिकांची खरेदी करण्यात आली आहे. सदर नवीन रुग्णवाहिका जिल्हास्तरावर माहे ०१/०२/२०२५ पर्यंत वितरीत करुन सदर रुग्णवाहिका सद्य:स्थितीत रुग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.

सद्य:स्थितीत राज्यामध्ये ४६८ रुग्णवाहिका कालबाहय असून सदर रुग्णवाहिकांची शासकीय विहित पध्दतीने लिलाव करुन विल्हेवाट लावण्याची प्रक्रीया प्रादेशिक परीवहन कार्यालयामार्फत सुरु आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कालबाहय रुग्णवाहिकांच्या बदल्यात ३४५ नवीन रुग्णवाहिका घेण्याचे प्रस्तावीत आहे.

(३) अंशतः खरे आहे,

राज्यात एकूण १९३६ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून सदरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ११०७ व राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत १११७ कंत्राटी वाहनचालक कार्यरत आहेत. अशा कंत्राटी वाहनचालकांना मानधन अदा करणेबाबत दिनांक ०६/११/२०२४ रोजी शासनास ५१.१९ कोटी इतक्या अनुदान मागणीचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (प्रा.आ.केंद्र) मुंबई कार्यालयाकडून सादर करण्यात आलेला होता.

शासन स्तरावरुन दिनांक २४/०२/२०२५ रोजी एकूण रक्कम रुपये ३९.१९ कोटी इतके अनुदान उपलब्ध झाले असून नियंत्रक लेखा व लेखा परीक्षा, पुणे कार्यालयामार्फत सर्व जिल्ह्यांना अनुदान वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) १. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पुरवठा केलेल्या १९ नवीन रुग्णवाहिकांचे १ फेब्रुवारी २०२५ पर्यत वाटप पूर्ण करण्यात आलेले आहे.

२. चंद्रपूर जिल्ह्यासाठी पुरवठा केलेल्या ५ नवीन रुग्णवाहिकांचे २ डिसेंबर २०२४ पर्यत वाटप पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर रुग्णवाहिका सदरील संस्थांमध्ये रुग्णसेवा देत आहेत.

(५) कालबाह्य रुग्णवाहिकांच्या बदल्यात २०२४-२५ मध्ये ३८४ रुग्णवाहिका खरेदी करुन वाटप करण्यात आल्या आहेत. तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कालबाहय रुग्णवाहिकांच्या बदल्यात ३४५ नवीन रुग्णवाहिका खरेदी प्रस्तावीत आहे.

कंत्राटी रुग्णवाहिका चालकांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहती मधील कंपनीमध्ये लागलेल्या आगीत कामगार जखमी झाल्याबाबत

**(१५)** *__३४७__ **श्री.भास्कर जाधव (गुहागर):** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील पुष्कर केमिकल ॲण्ड फर्टीलायझर कंपनीमध्ये आग लागून त्यात दोन कामगार होरपळल्याची घटना दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटना लपविण्याचा प्रयत्न कंपनीमार्फत करण्यात आला असून सदर कंपनीत गेल्या वर्षभरात अशा ३ ते ४ प्रकारच्या घटना घडूनही संबंधित कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपनीत झालेल्या दुर्घटनांमधील मृत व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच यास जबाबदार संबंधित अधिकारी व कंपनी प्रशासनाविरुध्द शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पुष्कर केमिकल ॲण्ड फर्टीलायझर या कारखान्यात दि. १७/१२/२०२४ रोजी पहाटे ०४:०० च्या सुमारास श्री. सोनू जगदिश पुजारी व श्री. सत्यनारायण सडा या दोन कामगारांनी थिनरच्या डब्यातील थिनर वापरुन शेकोटी तयार केली. परंतू अनावधानाने शेकोटी करण्याकरीता वापरण्यात आलेला थिनरचा डब्बा शेकोटीजवळ राहिल्यामुळे ज्वालाग्राही थिनरने पेट घेतला आणि शेकोटीजवळ बसलेल्या कामगारांच्या अंगावर थिनर उडून त्यांना भाजले.

(२) उपरोक्त घटनेची माहिती कारखाना व्यवस्थापनाने दिनांक १८/१२/२०२४ रोजी उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रत्नागिरी यांना सादर केली. सदर घटनेची चौकशी करून भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-A(२)(c) च्या भंगाबाबत मा. प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

या कारखाना व्यवस्थापनाचे अन्य चार कारखाने नोंदणीकृत असून सदर कारखान्यांमध्ये सन २०२४ या वर्षात घडलेल्या घटना व करण्यात आलेली कारवाई खालील प्रमाणे आहे:-

१) श्री. पुष्कर केमिकल ॲन्ड फर्टीलायझर्स लि. प्लॉट नं बी-१०२, बी-१०३, एम. आय.डी.सी लोटे परशुराम या कारखान्यात दि. २६/०४/२०२४ रोजी पत्र्याचे शेड काढण्याचे काम करीत असताना तोल जाऊन सुमारे १० फूट उंचीवरुन खाली पडल्यामुळे एका कामगाराच्या कंबरेला दुखापत झाली. चौकशीनंतर भोगवटादार व व्यवस्थापक यांचे विरुध्द प्रत्येकी एक खटला असे एकूण दोन  खटले मा. प्रथम वर्ग न्याययदंडाधिकारी, खेड, जि. रत्नागिरी यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

२) श्री. पुष्कर केमिकल ॲन्ड फर्टीलायझर्स लि. प्लॉट नं डी-१८, एम. आय.डी.सी लोटे परशुराम, ता.खेड, जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक २२/०५/२०२४ रोजी कारखान्यातील छतावरील पत्रे बसविण्याचे काम करीत असताना तोल जाऊन सुमारे ४० फूट उंचीवरुन खाली जमिनीवर पडून एका कामगाराचा मृत्यू झाला. चौकशीनंतर भोगवटादार व व्यवस्थापक यांच्या विरुध्द दोन खटले मा.प्रथम वर्ग न्याययदंडाधिकारी, खेड, जि. रत्नागिरी यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

३) श्री.पुष्कर केमिकल ॲन्ड फर्टीलायझर्स लि.प्लॉट नं बी-१०२, बी-१०३, एम. आय. डी. सी लोटे परशुराम, ता.खेड, जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक २२/०५/२०२४ रोजी ड्रेन व्हॉल्व बदलण्याचे काम करीत असताना दोन कामगारांच्या अंगावर सल्फ्युरीक ॲसिड उडून भाजल्यामुळे जखमी झाले. चौकशीनंतर कारखाना भोगवटादार आणि व्यवस्थापका यांचे विरुध्द दोन खटले मा. प्रथम वर्ग न्याययदंडाधिकारी, खेड, जि.रत्नागिरी यांच्या न्यायालयात दाखल करणेत आले आहेत.

४) श्री. पुष्कर केमिकल ॲन्ड फर्टीलायझर्स लि.प्लॉट नं बी-१०२, बी-१०३, एम. आय.डी.सी लोटे परशुराम, ता.खेड, जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक १८/०७/२०२४ रोजी कारखान्यातील इथिलिन ऑक्साईडच्या टँक मधून मेजरींग टँक मध्ये पाईप लाईनव्दारे इथिलिन ऑक्साईड ट्रान्सफर केल्यानंतर पाईप लाईन मधील इथिलिन ऑक्साईड पूर्णपणे काढण्याकरीता नायट्रोजन वायूने फ्लश करण्याचे काम सुरु होते. यावेळी नायट्रोजन वायू जास्त दाबाने सोडला गेल्यामुळे सदरची पाईपलाईन फुटली. इथिलिन ऑक्साईड टँकच्या खालचा व्हॉल्व (Tank Bottom Valve) तुटला व त्यामधून इथिलिन ऑक्साईडची गळती होऊन आग लागली. सदर आगीच्या घटनेमध्ये कोणीही जखमी अथवा मृत झाले नाही. चौकशीनंतर कारखाना भोगवटादाराविरुध्द मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

५) श्री.पुष्कर केमिकल ॲन्ड फर्टीलायझर्स लि. प्लॉट नं डी-१०, एम. आय.डी.सी. लोटे परशुराम, ता. खेड जि.रत्नागिरी या कारखान्यात दिनांक १९/११/२०२४ रोजी कारखान्यातील सल्फ्युरिक ॲसिड टँक मधील सल्फ्युरिक ॲसिड पाईपलाईनद्वारे ट्रँकर मध्ये ट्रान्सफर करीत असताना ॲसिड ट्रान्सफर करणारी HDPE पाईप

निसटली व त्यातील ॲसिड एका कामगाराच्या अंगावर उडाले. चौकशीनंतर कारखाना भोगवटादाराविरुध्द मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) या कारखान्यात दि.१७/०२/२०२४ रोजी घडलेल्या अपघातात कोणीही मृत झालेले नाही. अपघातातील भाजून जखमी झालेल्या दोन कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा एकूण खर्च रुपये ४,२१,१७८/- कारखाना व्यवस्थापनाने केला आहे. चौकशीनंतर कारखाना भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-A (२) (c) च्या भंगाबाबत मा. प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, ता.खेड, जि.रत्नागिरी यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग-१ अंतर्गत रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१६) *१३७१ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) यवतमाळ जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग-१ अंतर्गत फाळेगाव सिमेंट रस्ता, राणी अमरावती रस्ता व यावली माहुली मालापूर रस्ता (ता.बाभुळगाव) या रस्त्यांची दोन महिन्यांपूर्वी करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याने सदर रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मौजा फाळेगांव येथे खनिज विकास निधी अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ता झाला आहे. तसेच, मौजा राणी अमरावती ता. बाभुळगांव येथे लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत रस्ता बांधकाम हे काम झाले आहे. सदर दोन्ही कामे २ महिन्यांपूर्वी पूर्ण झालेली आहेत. सदरची कामे प्राकलनातील मानकाप्रमाणे पूर्ण करण्यात आली असून सध्या दोन्ही कामे सुस्थितीत आहे.

तसेच, यावली माहुली मालापूर रस्ता (इजिमा क्र.४२) एकूण लांबी ३.०० किमीपैकी १.२० किमी लांबीच्या रस्त्याचे काम इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण (लेखाशिर्ष ५०५४ ४३४४) अंतर्गत १ ते सव्वा वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आले असून सदर काम सुस्थितीत आहे. उर्वरीत रस्त्याचे काम सद्य:स्थितीत कोणत्याही योजनेत मंजूर नाही. सबब, सदर कामे निकृष्ट असल्याचा प्रश्नच उद्धवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.ब्राम्हणगाव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१७) * ७२४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. ब्राम्हणगाव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असून यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात कंत्राटदार व अधिकारी कर्मचाऱ्यांचे संगनमत असून अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट कामांमुळे या योजनेचा अपेक्षित लाभ ग्रामस्थांना मिळत नसल्याने सदर कामांची चौकशी करण्याबाबतची मागणी ब्राम्हणगाव कृती समिती व ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन योजनेतील कामांची दुरुस्ती करणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील** : (१) हे अशंत: खरे आहे. मौ**.** ब्राम्हणगाव कृती समिती व ग्रामस्थ यांनी दि.२०.०९.२०२४ रोजी या आशयाची तक्रार जिल्हा परिषदेकडे केली आहे.
(२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मौ**.** ब्राम्हणगाव (ता.मालेगाव, जि.नाशिक) पाणी पुरवठा योजनेचे कामे पूर्ण झाले असून सन २०२२ मध्ये योजना कार्यान्वित करण्यात आली होती. तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, बागलाण यांच्या स्तरावरून चौकशी केली असता वापरा अभावी योजनेतील काही उपांगे नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले असून ३० दिवसात संबंधित कामे पूर्ण करण्याबाबत व सदर योजना रितसर हस्तांतरीत करण्याबाबत संबधित ठेकेदारास दि.०४.०२.२०२५ रोजी सूचना दिल्या आहेत.

उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, बागलाण यांच्या चौकशी अहवालात आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने कामाची सखोल तपासणी करून सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जेनेरिक औषधी केंद्रे प्रभावीपणे कार्यान्वित करणेबाबत

**(१८) * १०३८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात औषधांच्या किंमती प्रचंड वाढत असून त्यावर उपाययोजना म्हणून कमी किंमतीची जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्यात आली असतानाही खाजगी मेडिकल स्टोअर्सकडून त्याची विक्री चढया दराने होत असून औषधांच्या किंमतीत मोठया प्रमाणात विसंगती असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत मिळणाऱ्या जेनेरिक औषधांचा पुरेसा साठा सुनिश्चित करणे, जेनेरिक औषधी केंद्रे सहज उपलब्ध करुन देणे, जेनेरिक औषधांच्या दरांवर शासनाचे नियंत्रण ठेवणे इत्यादीबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, यामुळे रुग्णांना सोसावा लागणारा आर्थिक भूर्दंड दूर करण्यासाठी यासंदर्भात निश्चित नियमावली व नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर : (**१) हे खरे नाही.

अ) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येत असलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना रुग्णालयाच्या औषधी भंडारातून विना शुल्क औषधी उपलब्ध करुन दिली जातात.

ब) औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ च्या तरतुदीनुसार औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या जातात. सदर आदेशांतर्गत नॅशनल लिस्ट ऑफ इसेन्सीअल मेडिसीन (National list of Essential Medicines) मधील

औषधांना औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ मध्ये अनुसूचीत औषधे (Scheduled Formulations) म्हणून अंर्तभूत करण्यात आले आहे. अनुसूचीत औषधांच्या किंमती केंद्र शासनाच्या NPPA (National Pharmaceutical Pricing Authority) व्दारा निश्चित केल्या जातात. त्यामुळे कोणीही व्यक्ती त्यापेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करु शकत नाही.

(२) अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित १८ रुग्णालयांच्या परिसरामध्ये सन २०१९ मध्ये जेनेरिक औषधी दुकाने एनजीओ/संस्था/सहकारी संस्था यांच्या मार्फत सुरु करण्यात आल्या. तसेच उर्वरित १८ रुग्णालयांमध्ये जेनेरिक दुकाने नॅकोफ या संस्थेमार्फत सुरु करण्यास दिनांक ०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे. परंतू सदर औषधी दुकाने कार्यान्वित झालेली नाहीत.

ब) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत खरेदी करण्यात येणारी औषधी जेनेरिक नावाने खरेदी करुन, आरोग्य संस्थांना पुरवठा करण्यात येऊन रुग्णांना विना शुल्क देण्यात येतात.

(३) अ) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ७ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषध यादी (Essential Drug List) मधील औषधे विनाशुल्क पुरविण्यात यावीत असे निर्देशीत करण्यात आले आहे.

ब) औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ च्या तरतुदीनुसार औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या जातात. सदर आदेशांतर्गत नॅशनल लिस्ट ऑफ इसेन्सीअल मेडिसीन (National list of Essential Medicines) मधील औषधांना औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ मध्ये अनुसूचीत औषधे (Scheduled Formulations) म्हणून अंर्तभूत करण्यात आले आहे. अनुसूचीत औषधांच्या किंमती केंद्र शासनाच्या NPPA (National Pharmaceutical Pricing Authority) व्दारा निश्चित केल्या जातात. त्यामुळे कोणीही व्यक्ती त्यापेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करु शकत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.तावशे (खुर्द) (ता.अर्जुनी-मोर, जि.गोंदिया) येथील राईस मिल मधून निघणाऱ्या हानिकारक गोष्टी रोखण्याबाबत

**(१९) * ४२०१ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.तावशे (खुर्द) (ता.अर्जुनी-मोर, जि.गोंदिया) येथे जिल्हा परिषद शाळेला लागून असलेल्या गणेश ॲग्रो इंडस्ट्रीज व प्रोडक्ट या राईस मिलमधून निघणारी राख, दुर्गंधीयुक्त पाणी, अनावश्यक कोंडा विद्यार्थ्यांच्या रोजच्या आहारामध्ये जाऊन त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महालगांव ग्रामपंचायतीने या कंपन्यांना दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास नोटीस पाठवून उक्त मिलमधून निघणारी राख, दुर्गंधीयुक्त पाणी, अनावश्यक कोंडा याचे योग्य नियोजन करणेबाबत कळवूनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया व अन्य अधिकाऱ्यांनी संबंधित कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

अशी तक्रार दिनांक २६/११/२०२४ रोजी लेखी पत्राव्दारे तावशी खुर्दच्या ग्रामस्थांनी महालगाव ग्रामपंचायतीला सादर केली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव यांच्यामार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून चौकशी करण्यात आली व संबंधित राईस मिलच्या संचालकांना सात दिवसाच्या आत उपाययोजना करण्याचे ग्रामपंचायतीने दिनांक २७/०२/२०२५ च्या पत्रांन्वये निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली औद्योगिक वसाहतीत औद्योगिक प्रयोजनासाठी दिलेल्या भूखंडाचा नियमबाह्यरित्या वापर केल्याबाबत

**(२०) * ४०१६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (प.) येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड औद्योगिक वसाहतीला अटी-शर्तींच्या अधीन राहून औद्योगिक प्रयोजनासाठी प्रती चौ.मी. रुपये ६६ इतक्या माफक दराने वितरीत केला असता त्याचा औद्योगिक वापर न करता नियमांचे उल्लंघन करुन बार, रेस्टॉरंट, कापड दुकाने, जीम, पब, खाजगी वितरक, लॉज, कार शोरूम आदि खाजगी वापरासाठी सदर भूखंडाचा वापर केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड शासनाची परवानगी न घेता परस्पर विक्री करुन शासनाच्या महसूलाचे कोटयवधी रुपयाचे आर्थिक नुकसान केल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी उपनगर जिल्हाधिकारी व महाराष्ट्र औद्योगिक विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदने देऊनही अद्याप यावर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) मौ. कांदिवली येथील स.क्र. ६७ पै. ६८,६९,७० पै, १६१ पै, १६२ पै, १४९ पै, १५७ पै. व चारकोप येथील स.क्र.४१ पैकी एकूण ११६ एकर २० गुंठे जमीनीचा अभिन्यास तयार करुन १६ भूखंड सार्वजनिक सुविधासाठी राखीव व १५० भूखंड औद्योगिक प्रयोजनासाठी निर्धारीत केले होते. औद्योगिक प्रयोजनासाठी निर्धारीत केलेले सदर शासकीय भूखंड प्रथम ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने औद्योगिक कंपन्यांना / औद्योगिक घटकांना प्रदान करण्यात आले होते. तद्नंतर सन १९८२ मध्ये सदर भूखंड महसूल व वन विभागाकडून काही अटी व शर्तींवर औद्योगिक कंपन्यांना/औद्योगिक घटकांना कब्जेहक्काने प्रदान करण्यात आले. सदर औद्योगिक वसाहत २००२ मध्ये उद्योग विभागाकडे हस्तांतरीत करुन जमीनीचा ताबा कांदिवली इंडस्ट्रियल इस्टेट लि. यांच्याकडे देण्यात आला आहे. जून, २०२४ मध्ये क्षेत्रिय कार्यालयाकडून पाहणी केली असता २१ भूखंडावर वाणिज्यिक वापर होत असल्याचे आढळले आहे.

(२), (३) व (४) कांदिवली औद्योगिक वसाहतीबाबत मोठया प्रमाणात अतिक्रमणे व विनापरवानगी हस्तांतरण असे विविध प्रकारची शर्तभंग होत असल्याचे निदर्शनास आल्याने व त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याने अशा शर्तभंग प्रकरणी महसूल व वन विभागाच्या तरतूदीनूसार कार्यवाही करण्यासाठी, दिनांक ०६/१२/२००२ व

दिनांक २५/०४/२००३ रोजीची महसूल व वन विभागाची शासन ज्ञापने रद्द करुन, उक्त जमीनीचा ताबा पुन्हा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे घेण्याबाबत मा. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने कांदिवली औद्योगिक वसाहतीमधील सदर जमीनीसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत दिशानिर्देश देण्याच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तथापि, या शासन निर्णयाविरुध्द कांदिवली को.ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लि. यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २२/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये महसूल व वन विभागाच्या दिनांक ०८/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयास स्थगिती दिली आहे.
(५) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या तांदूळावर प्रक्रिया केल्याबाबत**

**(२१) * ३८१७ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालकल्याण विकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत दोन रुपये किलोने मिळणाऱ्या तांदूळावर पॉलिश करून महागडया बासमती ब्रँडच्या नावाने विकण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा टोळीस छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी पकडल्याचेही माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या छाप्यात तांदूळ आणि डाळीच्या पॅकेटचा मोठा साठा आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत दोन रुपये किलोने मिळणाऱ्या तांदूळावर पॉलिश करुन महागड्या बासमती ब्रँडच्या नावाने विकण्यात येत असल्याची तक्रार प्राप्त नाही.
(२) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशन गट क्र. १११ करोडी, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गोडावून मध्ये प्रथम दर्शनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे आढळून आली.
(३) व (४) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशन गट क्र. १११ करोडी, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गोडावून मध्ये प्रथम दर्शनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे आढळून आली.

प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी ५ सदस्यीय चौकशी समिती स्थापित केली होती. सदर समितीच्या सदस्यांनी संबधित ठिकाणी जाऊन चौकशी केली असता महिला व बाल विकास विभागांतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे त्यावर असलेल्या विभागाच्या लेबलमुळे निदर्शनास आली. सदर पाकिटांची सविस्तर महिती खालीलप्रमाणे आहे:-

१) एनर्जी डेन्स तुरदाळ खिचडी प्रिमिक्सच्या १०० बॅग, प्रती बॅग २८ रुपये अंदाजे

२) मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन प्रिमिक्सच्या (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) ९५ बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे

३) मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन प्रिमिक्सच्या (मिलेट बेस्ड) (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) १० बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे

४) एनर्जी डेन्स मुगदाळ खिचडी प्रिमिक्सच्या (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) ९५ बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे.

५) २५ किलो वजनाच्या अन्सेबा लिहिलेल्या प्रिमिक्स तांदुळाच्या २२० बॅग, प्रति बॅग रु. ६२५ अंदाजे

अशा प्रकारे एकूण रु. १,४५,३००/- किमतीचा व वर्णनाचा माल मिळून आला. सदर माल एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या THR चा असल्याची खात्री झाल्यानंतर संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशनचे मालक, व्यवस्थापक व सुपरवायझर यांच्या विरोधात पोलिस स्टेशन, दौलताबाद येथे तक्रार दाखल केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील जिल्हा परिषद, बांधकाम उपविभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्याने केलेला गैरव्यवहार

**(२२) * ३०२४ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद, बांधकाम उपविभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्याने ७ अभियंत्यांच्या बनावट सह्या करून जुन्या एम.बी च्या आधारे मोजमाप पुस्तिकेत न नोंदविता त्रयस्थ व्यक्तीकडून देयके तयार करून जिल्हा वार्षिक योजना (DPC), २५१५ लेखाशीर्ष व इतर योजना अशी एकूण २७ रस्त्यांची कामे न करता बनावट कागदोपत्रांच्या आधारे कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी समिती नेमली असता याबाबतचा अहवाल वा कारवाई अद्यापही न करण्यात आल्याने अशा विलंबामुळे दोषींना अप्रत्यक्षरीत्या मदत करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करून रकमेची वसुली करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेच्या वसुलीसह संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०५ ऑगस्ट, २०२४ व दि.३१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या निवेदनाद्वारे काही योजनांमधील २७ कामांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याची तक्रार ग्रामविकास विभागास प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, बीड यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, बीड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. सदर समितीच्या अहवालानुसार बनावट स्वाक्षरी संदर्भातील तक्रार ही २७ रस्त्यांच्या कामांसंदर्भात नसून १४ कामांसंदर्भात आहे. त्यानुषंगाने चौकशी समितीने १४ कामांची चौकशी व पाहणी केली असता ३ कामे पूर्ण झाली असून या ३ कामांची देयके तक्रार प्राप्त होण्यापूर्वीच अदा केली आहेत.

जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड अंतर्गत ७ अभियंत्यांच्या बनावट सह्यांबाबत संबंधित अभियंत्यांना त्यांच्या स्तरावर बनावट स्वाक्षरी प्रकरणी गुन्हा दाखल करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**जळगांव जिल्ह्यात शालेय पोषण आहारामध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(२३) * ४५५६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात शालेय शिक्षण आहारासाठी पुरविल्या जाणारे कोटयवधी रूपयांचे धान्य शाळांऐवजी करोडी शिवार येथे असलेल्या गजानन ॲग्रो मिल या खाजगी मिलमध्ये जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचा लोगो व प्रकल्पाचा उल्लेख असलेल्या पोत्यातील धान्य सदर मिलमध्ये रिपॉलिश करून खाजगी कंपन्यांचे पॅकिंग करुन ते काळया बाजारात चढया दराने विकले जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांनी सदर मिलमध्ये धाड टाकून जवळपास धान्याचे नऊ ट्रक पकडल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

सदर घटना जळगांव जिल्ह्यामधील नसून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये घडलेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशन गट क्र. १११ करोडी, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गोडावून मध्ये प्रथम दर्शनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे आढळून आली.

(२), (३) व (४) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशन गट क्र. १११ करोडी, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गोडावून मध्ये प्रथम दर्शनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे आढळून आली.

प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी ५ सदस्यीय चौकशी समिती स्थापित केली होती. सदर समितीच्या सदस्यांनी संबधित ठिकाणी जाऊन चौकशी केली असता महिला व बाल विकास विभागांतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या घरपोच आहाराची पाकिटे त्यावर असलेल्या विभागाच्या लेबलमुळे निदर्शनास आली. सदर पाकिटांची सविस्तर महिती खालीलप्रमाणे आहे :-

१) एनर्जी डेन्स तुरदाळ खिचडी प्रिमिक्सच्या १०० बॅग, प्रती बॅग २८ रुपये अंदाजे

२) मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन प्रिमिक्सच्या (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) ९५ बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे

३) मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन प्रिमिक्सच्या (मिलेट बेस्ड) (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) १० बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे

४) एनर्जी डेन्स मुगदाळ खिचडी प्रिमिक्सच्या (०६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांकरिता) ९५ बॅग, प्रती बॅग २५ रु. अंदाजे.

५) २५ किलो वजनाच्या अन्सेबा लिहिलेल्या प्रिमिक्स तांदुळाच्या २२० बॅग, प्रति बॅग रु. ६२५ अंदाजे

अशा प्रकारे एकूण रुपये १,४५,३००/- किमतीचा व वर्णनाचा माल मिळून आला. सदर माल एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या THR चा असल्याची खात्री झाल्यानंतर संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी गजानन अॅग्रो सेल्स कॉर्पोरेशनचे मालक, व्यवस्थापक व सुपरवायझर यांच्या विरोधात पोलिस स्टेशन, दौलताबाद येथे तक्रार दाखल केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात क्षयरोग निर्मुलनासह रुग्णांना नियमित औषध पुरवठा करणेबाबत**

**(२४) * १७० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत माहे डिसेंबर, २०२४ पासून १०० दिवस मोहिम राबविण्यात येत असून मोहिमेच्या पहिल्या महिन्यातच राज्यात जवळपास ७०८७ नवीन क्षयरोग रुग्ण आढळले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४ मध्ये सुमारे २.२५ लाख क्षयरोग रुग्णांची नोंद करण्यात आली असून रुग्णांची संख्या वाढत असतानाच क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यात क्षयरोग निर्मुलनासह रुग्णांना नियमित औषध पुरवठा करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

राज्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत दिनांक ०७ डिसेंबर, २०२४ पासून राबविण्यात येत असलेल्या १०० दिवस मोहिमेत दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत ७८६७ नवीन क्षयरुग्ण आढळले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

राज्यात दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ अखेर सन, २०२४ मधील २,३०,०५० क्षयरोग रुग्णांची नोंदणी करण्यात आली आहे. क्षयरोगाच्या प्रसाराची साखळी खंडीत करण्यासाठी जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे गरजेचे आहे. त्यानुसार राज्यात जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधण्यावर भर देण्यात येत असल्यामुळे क्षयरोगाच्या रुग्ण संख्येत मागच्या वर्षाच्या तुलनेत वाढ दिसून येत आहे.

तसेच सन, २०२४ मध्ये केंद्रिय क्षयरोग विभागाने काही कालावधीत औषधांचा पुरवठा होणार नाही असे लेखी कळविल्यामुळे माहे मार्च व एप्रिल,२०२४ या काळात ३ FDC A या औषधांचा तुटवडा टाळण्यासाठी सदर औषधांची स्थानिक स्तरावर खरेदी करण्यासाठी सर्व जिल्हयांना तात्काळ १ कोटी ६३ लाख निधी वितरीत करण्यात आला होता. तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत रुपये ४ कोटी ९५ लक्ष रक्कमेचे ३ FDC A चे २,८२,८५७ स्ट्रिप्स राज्यस्तरावर खरेदी करुन जिल्ह्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील क्षयरुग्णांच्या औषधोपचारात माहे मार्च व एप्रिल, २०२४ दरम्यान प्रत्यक्षरित्या कोणताही खंड पडलेला नाही. तसेच, माहे मे, २०२४ पासून केंद्रीय क्षयरोग विभागाकडून औषधांचा पुरवठा सुरळीत सुरु झाला आहे.

(३) राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांच्या उपचारासाठी लागणारी सर्व औषधे हे केंद्र शासनाकडून पुरवठा करण्यात येतात. काही कारणास्तव औषधांचा तुटवडा भासल्यास केंद्रीय क्षयरोग विभाग राज्यास स्थानिक स्तरावर औषधे खरेदी करण्यास परवानगी देते आणि त्यानुसार राज्य शासन जिल्ह्यांना स्थानिक खरेदीची परवानगी देते. सद्य:स्थितीत केंद्र शासनाकडून क्षयरोगावरील औषधांचा राज्यास सुरळीत पुरवठा सुरू आहे.

तथापि, काही कारणास्तव राज्यात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा भासू नये यासाठी राज्य सरकारच्या निधीमधून रुपये १ कोटी ०५ लक्ष इतकी रक्कम व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या निधीतून रुपये ५ कोटी ९६ लक्ष इतकी रक्कम आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर तुटवडयाच्या काळात स्थानिक खरेदी करण्यासाठी जिल्हयांना वर्ग करण्यात आलेली आहे.

तसेच, निक्षय औषधी या ऑनलाईन प्रणालीद्वारे क्षयरोगावरील सर्व औषधांचे राज्यस्तरावरून नियमित संनियंत्रण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील बहुप्रतिक्षित महिला रुग्णालय कार्यान्वित करणेबाबत

**(२५) * १५० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात गत अनेक वर्षांपासून बांधून तयार असलेले महिला रुग्णालय अद्यापही कार्यान्वित करण्यात आले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्ह्यातील सामान्य रुग्णालयातील रुग्ण खाटांची संख्या मर्यादित असल्याने तसेच महिला रुग्णालय कार्यान्वित नसल्याने महिला रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महिला रुग्णालय अद्ययावत सोयी-सुविधांसह तातडीने कार्यान्वित करणे तसेच सामान्य रुग्णालयातील रुग्ण खाटांची संख्या वाढविणेसह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सदर इमारतीचे टप्पा-१ व टप्पा-२ चे बांधकाम सुरु झाले असून दोन्ही बांधकामाचे एकत्रीतपणे एकूण ७५ टक्के काम पूर्ण झालेले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सामान्य रुग्णालय, भंडारा हे ४८२ खाटांचे रुग्णालय असून येथे मर्यादित खाटांचे अभावी महिला रुग्णांची गैरसोय होत नाही. येथे महिला उपचारांच्या सुयोग्य अशा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, महिलांवरील स्वंतत्र उपचाराकरीता महिला खाटांची संख्या वाढविण्यासाठी महिला रुग्णालयांच्या बांधकामाची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुहू सांताक्रुझ (प.) मुंबई येथील इमारतीचे काम चालू असताना कामगाराचा झालेला मृत्यू

**(२६) * १४४१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू सांताक्रुझ (प.), (मुंबई) येथील ललित कुटीर बिल्डिंग, गुलमोहर रोड क्र.९, इमारतीचे काम चालू असताना श्री.शैलेंद्र पासवान या कामगाराचा १० व्या मजल्यावरुन पडून दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या विकासकाविरुध्द कारवाई करण्यासह मृत कामगाराच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

ललित कुटीर बिल्डिंग, जुहू गुलमोहर रोड क्र.९, सांताक्रुझ (प.), मुंबई येथे इमारतीचे काम चालू असताना श्री. शैलेंद्र बुचई पासवान (वय ५७ वर्ष) या कामगाराचा दि. २७ जुलै, २०२४ रोजी सायंकाळी ०६.३० च्या सुमारास १० व्या मजल्यावर लिफ्टजवळ साफसफाईचे काम करीत असताना तोल जावून ते लिफ्टच्या डक्टमध्ये पडल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

(२) सदर अपघाताच्या अनुषंगाने क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन मुख्य विकासक/मुख्य आस्थापना यांच्याविरुद्ध किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० व इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत निरीक्षण शेरे पारित केलेले आहेत. त्याचप्रमाणे मुख्य आस्थापना व कंत्राटदार यांच्या विरुद्ध उक्त नमूद कामगार कायद्यांतर्गत मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अंधेरी यांच्या न्यायालयात संगणकीय प्रणालीद्वारे खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

बांधकामाच्या ठिकाणी दिलेल्या तपासणी भेटीवरुन सदर बांधकामाची जागा धोकादायक असल्याचे दिसून आल्यामुळे, निरीक्षक तथा सरकारी कामगार अधिकारी यांनी महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत दिनांक १२.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

सदर अपघाताशी संबंधित साईट सुपरवायझर यांचेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०६ (१) अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०६९२, दि. २८.०७.२०२४ रोजी जुहू पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

कंत्राटदारामार्फत मयत कामगाराचे शव त्यांचे मुळ गावी नेण्याकरीता व अंत्यविधीसाठी तसेच तातडीची आर्थिक मदत म्हणून रक्कम रू.१,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार) मयत कामगाराच्या नातेवाईकास (मुलास) देण्यात आलेले आहेत. मयत कामगाराच्या वारसदारास नुकसान भरपाई मिळण्याकरीता कंत्राटदाराने कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत रक्कम रुपये ९,६२,७३०/- (अक्षरी रुपये- नऊ लाख बासष्ट हजार सातशे तीस) धनादेशाद्वारे मा. नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, मुंबई यांचेकडे जमा केलेले आहेत.

मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजना सोसायटीच्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या वैद्यकीय सेवेबाबत

**(२७) * ३५२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमाधारक कामगारांच्या कुटुंबांची संख्या ४८ लाख ७० हजार ४६० इतकी असून प्रत्यक्ष लाभार्थी संख्या २ कोटी इतकी असतानाही कामगार रुग्णालयांची दुरवस्था झाली असून तिथे मुलभूत सोई सुविधांचा मोठा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजना सोसायटीच्या (राकावियो) रुग्णालयांत कामगार व त्यांच्या कुटुंबियांना योग्य वैद्यकीय सेवा व औषधोपचार मिळण्यासाठी दरमहा त्यांच्या वेतनातून पैसे कपात करूनही त्यांना योग्य वैद्यकीय सेवा व औषधोपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार रुग्णालयांमध्ये विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी इ. अनेक पदे रिक्त असून अनेक ठिकाणी डॉक्टर ओपीडीमध्ये येतच नसल्याने कामगार वर्ग उपचारापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा सर्व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना राज्य कामगार विमा योजना सोसायटीचे अध्यक्ष तथा मुख्य सचिवांनी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात अस्तित्वात असलेली कामगार रुग्णालयात आरोग्य सेवा व रुग्णालये सुरळित, आधुनिक व अद्ययावत पध्दतीने कार्यरत करुन त्यासाठी आवश्यक डॉक्टर व कर्मचारी वर्ग देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) अंशत: खरे आहे, राज्यात एकूण १२ रुग्णालये असून, त्यामधील ०८ राकावियो रुग्णालयांच्या इमारती चांगल्या स्थितीत असून, आवश्यक त्या ठिकाणी विशेष दुरुस्ती करण्यात येत आहे. या रुग्णालयांच्या ठिकाणी मुलभूत सोई सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. तर उर्वरीत ०४ रुग्णालयांपैकी वरळी, मुलुंड व ठाणे येथील इमारतींचे बांधकाम मोडकळीस आल्याने त्या ठिकाणी नवीन इमारत उभारण्याची कार्यवाही सुरु आहे. तर उल्हासनगर येथील नवीन इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आले आहे.

(२) हे खरे नाही, सर्व राकावियो रुग्णालयामध्ये आवश्यक डॉक्टर्स व तांत्रिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, त्याठिकाणी वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर सर्व रुग्णालयांत दैनंदिन आवश्यक ती सर्व औषधी उपलब्ध करुन देण्यात येत असून, काही अपवादात्मक परिस्थितीत रुग्णालयात एखादी सेवा उपलब्ध नसल्यास सदर सेवा टाय-अप रुग्णालयांमार्फत रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे, राकावि योजनेंतर्गत रिक्त पदांमुळे वैद्यकीय सेवेत अडथळा निर्माण होऊ नये याकरीता कंत्राटी स्वरुपात विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, समवैद्यकीय, लिपीक व गट-ड कर्मचारी अशी एकूण १८०२ पदे कंत्राटी पध्दतीने भरलेली आहेत. ओपीडीच्या कामकाजाचे दिवस व वेळेत वाढ करण्यात आलेली असून, आता सर्व राकावियो रुग्णालयात सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत आठवडयाचे सर्व कार्यरत दिवस ओपीडी सुरु ठेवण्यात येते. त्यानुसार कामगार वर्ग वैद्यकीय उपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) अंशत: होय, मा.मुख्य सचिवांनी दि.१४.०१.२०२५ रोजी नियामक मंडळाच्या बैठकीत सर्व डॉक्टरांनी ओपीडी मध्ये वेळेवर उपस्थित राहण्याच्या सूचना दिलेल्या असून, या सूचना महाराकावि सोसायटी मार्फत सर्व राकावियो रुग्णालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) राज्य कामगार विमा योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा ह्या अधिक सुलभ व परिणामकारकरित्या पुरविण्याच्या दृष्टीने, रुग्णालयाच्या ठिकाणी आधुनिक स्वरूपाची वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात आलेली आहेत. याठिकाणी महामंडळाच्या निकषानुसार अतिरिक्त विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. कॅन्सर, हिमोफिलीया इ. गंभीर आजारावरील महागडया औषधींसह दैनंदिन उपचाराकरीता आवश्यक ती सर्व औषधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच रुग्णालयांच्या ठिकाणी सामान्य बाह्यरुग्ण विभागासोबतच मनोविकार चिकित्सा, त्वचारोग चिकित्सा आणि आयुष इ. बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात आले आहेत. त्याचबरोबर जुन्या रूग्णालयीन इमारतीच्या ठिकाणी नवीन रूग्णालय उभारणे आणि कार्यरत रुग्णालयांची आवश्यक त्या ठिकाणी विशेष दुरूस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड विष्णुपुरी येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशीन कार्यान्वित करणेसह कर्करोग रुग्णालय सुरू करणेबाबत

**(२८) * १०८६ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड विष्णुपुरी येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन मागील दोन वर्षांपासून बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कर्मचाऱ्यांनी रुग्णालयातील पंखे, मशीन, कुलर इत्यादी साहित्य भंगाराच्या नावाखाली विकून गैरव्यवहार केला असून या प्रकरणी अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख यांच्याकडून नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, मराठवाडयात वाढत असलेले कर्करोगाचे प्रमाण पाहता नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध असलेल्या ११२ एकर जागेवर १०० खाटांचे कर्करोग रुग्णालय सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन रुग्णालयातील गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणेसह सिटीस्कॅन मशीन तात्काळ बसवून तेथे १०० खाटांचे कर्करोग रुग्णालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे

नांदेड, विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सी.टी. स्कॅन मशीन बंद असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरजू दारिद्रय रेषेखालील व आपत्कालीन सेवेची गरज असणाऱ्या गंभीर रुग्णांच्या सोयीसाठी सी.टी. स्कॅन तपासणी जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड या रुग्णालयात करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

(२) संस्थेतील बालरोग विभागाच्या राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद निरीक्षणाच्या अनुषंगाने निरुपयोगी व भंगार साहित्य तात्काळ हलविणे आवश्यक होते. त्यामुळे सदर साहित्य भंगार म्हणून नियमानुसार विक्री करण्यात आले. सदर विक्री प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशीदरम्यान, भंगार साहित्याच्या वजनानुसार संस्थेस योग्य महसूल प्राप्त झाल्याचे तसेच विक्री प्रक्रिया नियमानुसार पार पडल्याचे तक्रारदाराच्या निदर्शनास आले. परिणामी, तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्याने चौकशी समितीने सदर प्रकरणी चौकशीची कार्यवाही समितीमार्फत स्थगित केली.

(३) होय.

नांदेड येथे कर्करोग रुग्णालय स्थापन करण्याकरीता विविध लोकप्रतिनिधींनी सुद्धा मागणी केलेली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिल्हा वार्षिक योजनेतून नवीन सी.टी.स्कॅन मशीन पुरवठा करण्याबाबत पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

कर्करोग रुग्णालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे-बेलापूर रस्ता तसेच शिव-पनवेल महामार्गास लागून असलेल्या एमआयडीसी पट्ट्यातील भूखंड हस्तांतरणाबाबत

**(२९) * ४०२५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, बेलापूर औद्योगिक पट्ट्या तील ठाणे-बेलापूर रस्ता तसेच शिव-पनवेल महामार्गास लागून असलेल्या एमआयडीसी पट्ट्यातील २२५ एकरच्या अतिक्रमित जमीनीवर समूह पुनर्विकास योजनेसाठी सदरचा भूखंड खाजगी विकासकामार्फत गृहसंकुल प्रकल्प राबविण्यासाठी एमआयडीसीने नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगासाठी एमआयडीसीला भूखंडाची नितांत गरज असताना सदरहू भूखंड खाजगी विकासकामार्फत पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी नवी मुंबई महापालिकेस हस्तांतरीत करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन भूखंडाचे हस्तांतरणाची मान्यता रद्द करणे, भूखंड त्वरीत ताब्यात घेणे व विहित प्रयोजनासाठी त्याचा वापर करणेबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

असा कोणताही निर्णय अद्याप महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली ( जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत

**(३०) * १४७८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील फेज-१ व फेज- २ मधील ३६ हेक्टर जमीनीवर मोठया प्रमाणात बेकायदा गॅरेज व निवासी बांधकामे झाली असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक वसाहतीतील कारखाने व निवासी यातील ५०० मीटर अंतराचा बफर झोन अशाच बेकायदा बांधकामांनी व्यापलेला असल्याचे एमआयडीसीने देखील मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमुदान कंपनीत झालेल्या स्फोटानंतर अशा अनधिकृत बांधकाम व त्यामुळे धोक्यात आलेली सुरक्षितता याबाबतचा मुद्दा अधिकच गंभीर झाला असून याकडे एमआयडीसी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत तसेच यातील दोषी कंपन्या व अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) मऔवि महामंडळाच्या डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील निवासी विभागालगत आजदे, सागांव, सांगर्ली, सोनारपाडा ही गावठाणे असून गावठाण क्षेत्रालगतच्या महामंडळाकडून वाटप न झालेल्या

जागेवर अतिशय जुने रहिवासी व इतर बांधकामे आहेत व सदर जागा अतिक्रमण म्हणून मऔवि महामंडळाच्या नकाशावर दर्शविण्यात आलेली आहे.

तसेच कल्याण-शिळ रस्त्यालगत असलेल्या गॅरेजेसवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व म.औ.वि.म. यांचेतर्फे संयुक्तपणे निष्कासनाची कारवाई दि. १२/०६/२०२४ व दि. १३/०६/२०२४ रोजी करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रधान सचिव (उद्योग), यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. २८/०५/२०२४ अन्वये कृती आराखडा (Action Plan) तयार करणेसाठी कृती आराखडा समितीची स्थापना करण्यात आली आहे.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक धोकादायक व अति धोकादायक कारखाने स्थलांतरीत करणे तसेच विनापरवाना कारखाने बंद करणेबाबत प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून दि.२७ मे, २०२४ रोजी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात निवासी क्षेत्रालगत असलेल्या अतिधोकादायक कंपन्यांची संयुक्त पाहणी अंती आढळलेल्या कंपन्याची माहिती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तसेच बाष्पके संचालनालय यांच्यांकडून सह मुख्य कार्यकारी अधिकारी (कोंकण), मऔविम यांनी तात्काळ घ्यावी, त्याचप्रमाणे स्थलांतराबाबत सुयोग्य धोरण ठरवावे, असे निर्देश देण्यात आले.

वरील बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बाष्पके संचालनालय, कामगार विभाग, अन्न व औषध प्रशासन या विभागांनी डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अतिधोकादायक / धोकादायक कारखान्यांचे सर्वेक्षण करण्याचे काम संबंधीत विभागामार्फत स्वतंत्ररित्या करण्यात आले.

कृती आराखडा समितीने घेतलेल्या बैठकांमध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔवि महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली क्षेत्रीय सर्वेक्षण समितीने सर्वेक्षणाचे काम संयुक्तपणे औद्योगिक क्षेत्रातील रहिवासी क्षेत्रापासून ५० मी. अंतरापर्यंत, १०० मी. अंतरापर्यंत व १०० मी. अंतरापुढे असलेल्या उद्योगांचे सविस्तर सर्वेक्षण प्रत्यक्ष जागेवर जाऊन पूर्ण केले आहे. सदर सर्व्हेक्षणादरम्यान धोकादायक व अतिधोकादायक इत्यादी अशी उद्योगांची वर्गवारी करून पूर्ण केली असून याबाबतचा परिपूर्ण अहवाल दि.२१/०८/२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यावेतन देणेबाबत

**(३१) * १७३८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळण्याऱ्या विद्यावेतनाचा तपशील प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेला सादर करण्याचे आदेश राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले असताना देखील २० वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यावेतनाचा तपशील सादर केला नसल्याने त्यांना आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी डॉक्टरांना नियमित विद्यावेतन देण्याच्या सूचना तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या असतानाही मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना मागील तीन महिन्यांचे विद्यावेतन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना थकबाकीसह नियमित विद्यावेतन देणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दिनांक २८/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विद्यावेतनाचा तपशील सादर न केलेल्या राज्यातील एकूण २० वैद्यकीय महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यामध्ये ११ शासकीय/ महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये आणि ०९ खाजगी विनाअनुदानित/ अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश होता.

(२) हे खरे आहे.

निवासी डॉक्टरांच्या नियमित विद्यावेतनाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०८/२०२४ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निर्देशांनुसार प्रत्येक चालू महिन्याच्या २० तारखेस त्यापुढील महिन्याचे विद्यावेतन अदा करण्यासाठी आवश्यक निधी बीम्स प्रणालीवर नियमितपणे उपलब्ध करुन देणेबाबत वित्त विभागाने स्थायी आदेश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी विद्यार्थ्यांच्या खात्यात विद्यावेतन जमा होण्यासाठी आवश्यक ते नियोजन संचालनालय तसेच सर्व संस्था स्तरावरुन करण्यात येऊन संस्थांमध्ये कार्यरत निवासी डॉक्टरांना नियमितपणे दरमहा विद्यावेतन अदा करण्यात येत आहे.

तथापि, माहे ऑक्टोबर पर्यंत ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जे.जे रुग्णालय, मुंबई संस्थेला वितरीत करण्यात आलेले अर्थसंकल्पित अनुदान पूर्णत: खर्ची पडल्यामुळे जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे ऑक्टोबर महिन्याचे १२ दिवसांचे, नोव्हेंबर महिन्याचे ३० दिवसांचे तर डिसेंबर महिन्याचे ३१ दिवसांचे विद्यावेतन प्रलंबित होते.

(३) व (४) जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे प्रलंबित विद्यावेतन अदा होण्याच्या अनुषंगाने संस्थेने केलेल्या मागणीनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने मूळ अर्थसंकल्पित तरतूद १०० टक्के प्रमाणात वितरीत करण्यात आली व तदनंतर ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचे विद्यावेतन जानेवारी महिन्यामध्ये पूर्णत: अदा करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे, जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनाची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी विधानमंडळ हिवाळी अधिवेशन-२०२४ मध्ये रुपये ३१४१५७ हजार अतिरिक्त निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीप्रमाणे, जे.जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे जानेवारी, २०२५ पर्यंतचे विद्यावेतन अदा करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(३२) * ३७२५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ लाखापेक्षा जास्त अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणे, सेवानिवृत्तीनंतर दरमहा पेन्शन, ग्रॅच्युईटी मिळणे, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एकरकमी सेवासमाप्ती लाभ देणे, रितसर आवश्यक रजिस्टर पुरवावे, अंगणवाडी कामाव्यतिरिक्त इतर कोणतेही कामे अंगणवाडी सेविकांना देऊ नये, नियमानुसार रजा मंजूर करणे, नेटवर्क अभावी पोषण ट्रॅकर कामात येणाऱ्या अडचणी दूर करणे इत्यादी अनेक मागण्यांकरीता त्यांनी आंदोलन केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे मार्च, २०२४ पासून रुपये ५००० इतकी वेतनवाढ व इतर भत्ते जाहीर करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वारंवार मागणी व आंदोलने करुनही त्यांच्या मागण्या अद्यापही पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिलांचे सबलीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून अंगणवाडी सेविका, मदतनीस व इतर कर्मचाऱ्यांना वेतनवाढ व इतर भत्ते मिळणेकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून अंगणवाडी सेविका यांच्या दरमहा मानधनामध्ये रुपये ३०००/- व अंगणवाडी मदतनीस यांच्या दरमहा मानधनामध्ये रुपये २०००/- याप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०२४ पासून सुधारित दरानुसार मानधन अदा करण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस करीत असलेल्या कामाच्या आधारे त्यांना दरमहा अनुक्रमे रुपये २०००/- व रुपये १०००/- पर्यंत प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनासमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(४) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये करण्यात आलेली वाढ विचारात घेऊन त्यांना माहे ऑक्टोबर, २०२४ पासून सुधारित दरानुसार मानधन अदा करण्यात येत आहे. तसेच, प्रोत्साहन भत्त्याकरिता विहित केलेल्या निकषांपैकी काही निकषांची पोषण ट्रॅकर ॲप्लीकेशनमधून माहिती उपलब्ध होण्यास अडचणी येत असल्याने प्रोत्साहन भत्ता अदा होऊ शकला नाही. त्यानुषंगाने, प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करुन त्याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.